# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट ४१९-२०२४** **दिनांक-०९/११/२०२४**

## " एक पुरुष वेश्यादलालास ताब्यात घेवुन तीन पिडीत महीलांची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा पथकास यश "

दि.०८/११/२०२४ रोजी **अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांना बातमीदारांकडुन पुरुष नामे- राजेश हसमुखलाल शहा** वय ५० वर्षे हा वेश्याव्यवसाय करीत असुन त्याचे मोबाईल क्रमांकावर पुरुष गिऱ्हाईकाने संपर्क साधला की, व्हाटसअॅपव्दारे पुरुष गिऱ्हाईकाना फोटो पाठवुन, पैशाच्या मोबदल्यात वेश्यागमनासाठी गिऱ्हाईकांना मुली पुरवित असलेबाबत बातमी मिळाली.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने कायदेशीर बाबींची पुर्तता करुन बोगस गिऱ्हाईक व दोन पंच बोलावुन त्यांना कारवाई बाबत माहीती देवुन पुरुष वेश्यादलाल राजेश याने सांगितल्याप्रमाणे सेलीब्रीटी हॉटेल एव्हरशाईन गेट जवळ वसई पुर्व. या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन १२.५६ वा. छापा टाकला असता, यातील पुरुष वेश्यादलाल नामे राजेश हसमुखलाल शहा वय ५० वर्षे रा.३८५,मरीन लाईन्स मुंबई-२ ,मुळ गाव- मेहसाना,हिम्मतनगर, अहमदाबाद याने ०३ पिडीत मुलींना वेश्यागनमासाठी प्रवृत्त करुन वेश्यागमनाची तीन मुलींची २९०००/- रु रक्कम ठरवुन त्यातील कमीशन स्वत:च्या उपजिवीकेकरीता स्विकारुन पिडीत मुलींना वेश्यागमनाकरीता उपलब्ध करुन दिल्याने पुरुष वेश्यादलाल यास ताब्यात घेवुन ०३ पिडित मुलींची सुटका केली आहे. सदर बाबत पुरुष वेश्यादलाल याच्याविरुध्द पोहवा/किणी यांनी सरकार तर्फे फिर्यादी दिल्याने वालीव पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र. I ५७८/२०२४, भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १४३(२), सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ प्रमाणे दिनांक ०८/११/२०२४ रोजी गुन्हा दाखल आहे

सदरची कारवाई ही मा.पोलीस उपआयुक्त श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो (गुन्हे), सहायक पोलीस आयुक्त श्री. मदन बल्लाळ (गुन्हे शाखा), यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि/सौरभी पवार व सफौ/गवई, पोहवा/०५०२८ किणी, मपोहवा/०५००४ डोईफोडे, पोहवा/०७०५५ शेटये, चालक पोहवा/०७०६६ पागी, मपोशि/१६०९५ पाटील सर्व नेम.अनै.मा.वा.प्र.कक्ष नालासोपारा यांनी उत्कृष्ठरित्या पार पाडली आहे.

-------ooooo-------